ePaper
वाईनच्या दराचा भडका उडणार? वाईन उत्पादनात मोठी घट होणार?
| वर्ष - 9 | अंक -107 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- यॉर्कर किंग' बुमराहचे साम्राज्य धोक्यात!
- जितेश शर्माची यष्टीरक्षकासाठी लॉटरी
- योगी आदित्यनाथ की अमित शहा?
- आयोगापासून कायद्यातील बदलांपर्यंत


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 11 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**भीषण वास्तव!** बिहारच्या सीतामढीत जिल्ह्यात एचआयव्हीचे ७,४०० रुग्ण

# 400 शालेय विद्यार्थ्यांना एचआयव्ही!

## सीतामढी जिल्हा राज्यातील 'हाय-लोड झोन'; आरोग्य यंत्रणेसमोर

। पटना ।
वृत्तसंस्था । महाईन्यूज

**बिहारमधील सीतामढी जिल्ह्याने एचआयव्ही संक्रमणाच्या बाबतीत चिंतेची लाल रेषा ओलांडली आहे. एकीकडे देशभरात एचआयव्ही/एड्स नियंत्रणासाठी शासकीय आणि सामाजिक स्तरावर बहुविध उपक्रम राबवले जात असताना, दुसरीकडे या एका जिल्ह्यातील रुग्णसंख्येतील झपाट्याने वाढ आरोग्य विभागासाठी गंभीर इशारा ठरत आहे.**



सीतामढी जिल्ह्यात तब्बल ७,४०० नागरिक एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याचे अधिकृत आकडेवारीत स्पष्ट झाले आहे. त्यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सुमारे ४०० रुग्ण हे शालेय वयातील मुले आहेत. ही परिस्थिती केवळ आरोग्य व्यवस्थेसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

### 'हाय-लोड सेंटर' म्हणून ओळखले जाणारे एआरटी सेंटर

सीतामढीतील एआरटी (Anti-Retroviral Therapy) सेंटरला आता राज्यातील सर्वाधिक एचआयव्ही रुग्ण असलेले 'हायलोड सेंटर' असे म्हटले जात आहे. या केंद्रामध्ये दर महिन्याला जवळपास ५,००० रुग्णांना जीवनरक्षक औषधे पुरवली जातात. उर्वरित रुग्ण राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये किंवा दिल्ली, मुंबई आणि कोलकाता सारख्या महानगरांमध्ये उपचारासाठी जात असल्याचेही समोर आले आहे.

आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, दर महिन्याला ४० ते ६० नवीन एचआयव्ही पॉझिटिव्ह रुग्ण येथे नोंदवले जात आहेत. अशा वाढत्या आकड्यांमुळे सीतामढी जिल्हा आज बिहारचा एचआयव्ही हॉटस्पॉट बनला आहे.

### प्रसाराचे प्रमुख कारण — 'जागरूकतेचा अभाव'

तज्ज्ञांच्या मते, सीतामढीतील वाढत्या संक्रमणामागील सर्वात मोठे कारण म्हणजे सामाजिक स्तरावर एचआयव्हीबद्दलची सर्वांगीण माहिती व जागरूकतेचा स्पष्ट अभाव.

### ग्रामीण भागात एचआयव्ही प्रसाराच्या मार्गांबद्दल अज्ञान

असुरक्षित लैंगिक संबंध, संक्रमित सुया/सिरींजचा वापर
अशुद्ध ब्लेड/टॅटू उपकरणांचा वापर
रक्त तपासणीशिवाय रक्त संक्रमण
गर्भवती महिलांची एचआयव्ही तपासणी न करणे

या सर्व कारणांनी एकत्रितपणे संक्रमणाचा वेग वाढत चालल्याचे मानले जात आहे.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही – सर्वात मोठा धक्का

४०० शालेय विद्यार्थ्यांमध्ये एचआयव्ही आढळणे हे या संकटाचे सर्वात भीषण रूप मानले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, यामागे बहुतांश प्रकरणांमध्ये खालील कारणे दिसून आली आहेत:

बाधित पालकांमुळे जन्मजात संक्रमण

### औषधोपचारादरम्यान संक्रमित सुईंचा वापर

अपघाती रक्त संक्रमण
लैंगिक अत्याचाराचे काही प्रकरणे

ही सर्व कारणे समाजातील गंभीर असंवेदनशीलता, आरोग्य सेवांची दुर्लक्ष भावना आणि अपुरी तपासणी व्यवस्था दर्शवतात.

### सरकारी जनजागृती मोहिमा — परिणाम नगण्य

आरोग्य विभाग आणि सामाजिक संस्थांकडून वेळोवेळी जागरूकता मोहिमा राबवल्या जातात. परंतु जिल्ह्यातील परिस्थितीवरून स्पष्ट होत आहे की ही पद्धत पुरेशी प्रभावी ठरत नाही.

लोक अजूनही एचआयव्हीच्या बाबतीत संकोच, भीती, लाज आणि चुकीच्या समजुतींमध्ये अडकलेले दिसतात. तपासणीसाठी पुढे येणे आणि उपचारांबद्दल खुलेपणाने बोलणे कमी असल्यामुळे संक्रमणाची साखळी तुटत नाही.

### एचआयव्ही – उपचार शक्य, प्रतिबंध १०० टक्के शक्य

एचआयव्ही आजाराबद्दल जागरूकता वाढवणे हीच परिस्थितीतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग असल्याचे सर्व तज्ज्ञ एकमुखाने सांगतात.

### प्रतिबंधासाठी आवश्यक काळजी

सुरक्षित लैंगिक संबंध
रक्त संक्रमणापूर्वी तपासणी
स्वच्छ व नवीन सिरिंजचा वापर
शेव्हिंग किंवा टॅटूसाठी निर्जंतुक साधनांचा वापर
गर्भवती महिलांची अनिवार्य एचआयव्ही तपासणी

ह्या गोष्टींचे काटेकोर पालन झाले तर संक्रमण पूर्णपणे रोखता येऊ शकते.

भेदभाव संपवा, सहकार्य वाढवा

एचआयव्ही पॉझिटिव्ह रुग्णांबद्दल समाजात अजूनही मोठ्या प्रमाणावर भेदभाव दिसून येतो. त्यामुळे अनेक रुग्ण तपासणी किंवा उपचारांपासून दूर राहतात. तज्ज्ञांचे मत आहे:

"एचआयव्ही रुग्ण हे दोषी नसतात. ते आजारी आहेत आणि समाजाने त्यांच्याबद्दल सहानुभूती व आदर ठेवणे आवश्यक आहे."

शिक्षण संस्था, पंचायत आणि स्वयंसेवी संस्था — तातडीने पुढे येण्याची गरज

जिल्ह्यातील स्थिती लक्षात घेता, तज्ज्ञ खालील उपाय तातडीने राबवण्याची मागणी करतात:

शाळांमध्ये लैंगिक स्वास्थ्य व एचआयव्ही जागरूकता कार्यक्रम
पंचायत स्तरावर मोफत एचआयव्ही तपासणी शिबिरे
नवविवाहित जोडप्यांसाठी अनिवार्य आरोग्य तपासणी
युवा व प्रौढांसाठी जागरूकता कार्यशाळॉ
एआरटी केंद्रांची सुविधा वाढवणे

## सीतामढीचा इशारा

— देशभरात जागरूकतेची आवश्यकता
सीतामढीतील आकडे केवळ एका जिल्ह्याचे नसून संपूर्ण देशासाठी गंभीर इशारा आहेत. एचआयव्ही आजार पूर्णपणे नियंत्रित करण्यासाठी फक्त सरकार नव्हे तर प्रत्येक नागरिकाने आपला सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

## डुमरा मध्ये सर्वाधिक, चोरौत मध्ये सर्वात कमी रुग्ण

सीतामढी जिल्ह्यातील विविध प्रखंडांमध्ये एचआयव्ही रुग्णसंख्येत मोठी तफावत दिसून आली आहे. नोंदणीकृत रुग्णांमध्ये डुमरा प्रखंडात सर्वाधिक, तर चोरौत प्रखंडात सर्वात कमी रुग्ण आढळले आहेत.



डुमरा – 1107 (सर्वाधिक)
परिहार – 700
रुन्नीसैदपूर – 708
बथनाहा – 574
सोनबरसा – 514
रीगा – 507
चोरौत – 102 (सर्वात कमी)

## ७०४ बसेस मालकीच्या वाहतुकीस अयोग्य ठरल्यामुळे काढून टाकण्यात आल्या

# पीएमपीएलच्या जुन्या गाड्या स्कॅप

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर परिवहन महामंडळच्या ताफ्यातील (PMP)३० जुन्या बसगाड्यांना मागील महिन्यात स्कॅप करण्यात आले आहे. या बसगाड्या १२ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे आणि वाहतुकीस अयोग्य ठरल्यामुळे काढून टाकण्यात आल्या आहेत. सध्या पीएमपीच्या स्वय मालकीचे ७०४ बसेस आहेत. लवकरच आणखी ३९ बस स्कॅप करण्याच्या मार्गावर आहेत असे पीएमपी (PUNE ) प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.**

## बसेसना टाटा, बाय-बाय



पीएमपीच्या नियमांनुसार कोणतीही बस १२ वर्ष पूर्ण झाले की तिची तांत्रिक पाहणी केली जाते.बस यंत्रणेच्या घडामोडी,देखभाल खर्च आणि वाहनांच्या सुरक्षिततेचा विचार करूण निर्णय घेतला जातो.यंदा अशा जुन्या आणि देखभाल खर्च अधिक असलेल्या पीएमपीच्या स्वत:च्या मालकीच्या बसगाड्या स्कॅप करण्यात आले. स्कॅप केलेल्या बसगाड्यांमुळे सध्या पीएमपीच्या ताफ्यात काही प्रमाणात घट झाली असली तरी केंद्र सरकारकडून एक हजार बसेस टप्प्या टप्प्याने येत आहेत.मागील महिन्यात १२ वर्ष पूर्ण झालेली पीएमपीच्या ३० बस स्कॅप केले असून अजून ३९ बस स्कॅप करण्याची प्रक्रिया चालू आहे.स्कॅप प्रक्रियेमुळे तांत्रिकदृष्ट्या अकार्यक्षम बसगाडयापासून मुक्तता होत असून प्रवाशांना अधिक चांगली सुविधा आणि पर्यावरणपूरक सेवा पुरविण्यावर भर दिला जात आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड आणि महाराष्ट्र स्टेट रोड ट्रांसपोर्ट कॉर्पोरेशन यांच्या दरम्यान आळंदी परिसरात नवीन बस आगार स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

याअंतर्गत एसटीकडून चार एकर जमीन पीएमपीएमएलला देण्यास मंजूरी मिळाली आहे. प्रस्तावनुसार, एसटीची मालकी असलेली आठ एकरांची जागा असून त्यापैकी चार एकर पीएमपीएमएलला हस्तांतरीत करण्यात येणार आहे. या जागेवर सुमारे ८० बसगाड्या थांबू शकतील, असे आगार बांधकामाचे नियोजन आहे. या निर्णयामुळे आळंदी आणि आसपासच्या भागातील सार्वजनिक वाहतूक सेवा अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे. बस आगारामुळे बस रॅपिंग, देखभाल व पार्किंगची सोय सुलभ होईल

## सेवा पुरविण्यावर भर दिला

स्कॅप केलेल्या बसगाड्यांमुळे सध्या पीएमपीच्या ताफ्यात काही प्रमाणात घट झाली असली तरी केंद्र सरकारकडून एक हजार बसेस टप्प्या टप्प्याने येत आहेत.मागील महिन्यात १२ वर्ष पूर्ण झालेली पीएमपीच्या ३० बस स्कॅप केले असून अजून ३९ बस स्कॅप करण्याची प्रक्रिया चालू आहे.स्कॅप प्रक्रियेमुळे तांत्रिकदृष्ट्या अकार्यक्षम बसगाडयापासून मुक्तता होत असून प्रवाशांना अधिक चांगली सुविधा आणि पर्यावरणपूरक सेवा पुरविण्यावर भर दिला जात आहे.

आणि प्रवाशांना नियमित सेवा मिळण्यास मदत होईल.स्थानिक वाहनधारक तसेच प्रशासनाने या प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आता पुढील टप्प्यात विभागीय आयुक्त कार्यालयातून आवश्यक कागदपत्रांची परवानगी, जागेचे नकाशे मान्यता करणे व बांधकामाचा समावेश होईल. या प्रकल्पाचे वेळापत्रक आणि बांधकाम खर्च याबाबत अधिक माहिती पुढील महिन्यात जाहीर करण्यात येईल, अशी माहिती पीएमपीएमएलच्या अधिकाऱ्यांनी दिली.पुणे महानगर परिवहन महामंडळच्या ताफ्यातील (PMP)३० जुन्या बसगाड्यांना मागील महिन्यात स्कॅप करण्यात आले आहे. या बसगाड्या १२ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्यामुळे आणि वाहतुकीस अयोग्य ठरल्यामुळे काढून टाकण्यात आल्या आहेत.सध्या पीएमपीच्या स्वय मालकीचे ७०४ बसेस आहेत.

लवकरच आणखी ३९ बस स्कॅप करण्याच्या मार्गावर आहेत असे पीएमपी (PUNE ) प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.पीएमपीच्या नियमांनुसार कोणतीही बस १२ वर्ष पूर्ण झाले की तिची तांत्रिक पाहणी केली जाते.बस यंत्रणेच्या घडामोडी,देखभाल खर्च आणि वाहनांच्या सुरक्षिततेचा विचार करूण निर्णय घेतला जातो.यंदा अशा जुन्या आणि देखभाल खर्च अधिक असलेल्या पीएमपीच्या स्वत:च्या मालकीच्या बसगाड्या स्कॅप करण्यात आले.

# 'सवाई गंधर्व महोत्सवा'ची सुरुवात

## पाच दिवसीय महोत्सव महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रीडासंकुलात होणार

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सनईच्या मंगल सुरावटी आणि कंठसंगीतासह वादनाचा सहजसुंदर आविष्काराच्या साक्षीने ७१ व्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत महोत्सवाची बुधवारी उत्साहात सुरुवात झाली. उद्घाटनाच्या क्षणीच संगीतमय भावावस्था निर्माण करणाऱ्या सनईवादक लोकेश आनंद आणि किराणा घराण्याच्या गायिका डॉ. चेतना पाठक यांच्या सादरीकरणाने महोत्सवाची पहिली संध्या अविस्मरणीय ठरली.**




आर्य संगीत प्रसारक मंडळ आयोजित हा पाच दिवसीय महोत्सव यंदा मुकुंदनगर (PUNE) येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रीडासंकुलात रंगत आहे. सुमारे दहा हजार रसिकांना सामावणाऱ्या या संकुलात दिवंगत कलाकारांना आदरांजली वाहून स्वरनंदनवनाची नांदी झाली.महोत्सवाचे प्रथम स्वरपुष्प दिल्लीस्थित लोकेश आनंद यांनी अर्पण केले. कालीचरण, पं. अनंतलाल आणि पं. दयाशंकर यांचा परंपरागत वारसा जपत त्यांनी सनईवर राग 'मुलतानी' सादर केला. विलंबित एकतालातील विस्तार, त्यानंतर गुरू पं. जसराज यांच्या 'आये मोरे साजनवा' चे द्रुत सादरीकरण आणि केहरवा तालातील बनारसी धूनने रसिकांची दाद मिळवली. त्यांना पंडुरंग पवार (तबला) आणि केदार जाधव (सहशहनाई) यांनी प्रभावी साथ दिली.

यानंतर स्वरयोगिनी पद्मविभूषण डॉ. प्रभा अत्रे यांच्या शिष्या डॉ. चेतना पाठक यांनी राग 'भीमवंती'चे माधुर्य खुलवले.'गाऊ मै हरीनाम'पासून 'लागे मोरे नैन' आणि तराणा या त्रिताल–एकताल रचनांच्या उत्तुंग सादरीकरणाने सभागृह भारावले. 'बलमा ने चुराई निंदिया' या दादऱ्याने त्यांनी सादरीकरणाला मोहक विराम दिला.

## बस सेवेची सुविधा

अमेय बिच्चू (हार्मोनिअम), पंडुरंग पवार (तबला) आणि तानपुरा वादकांच्या साथीत त्यांचे गायन अधिक खुलले.महोत्सवाला येणाऱ्या रसिकांच्या परतीची सोय लक्षात घेऊन पीएमपीएमएलतर्फे विशेष बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महोत्सव संपल्यानंतर रात्री १०:३० वाजता मुकुंदनगरहून निगडी, धायरी, कोथरूड डेपो आणि वारजे माळवाडी या मार्गांवर बस सुटतील. तसेच अधिक गर्दीची शक्यता लक्षात घेता शनिवार, १३ डिसेंबर रोजी रात्री १२:३० वाजता अतिरिक्त बसची सोयही करण्यात आली आहे.

## नागरिकांचा मनपाला इशारा
### अनधिकृत भराव काढण्याच्या आश्वासनानंतरही कोणतीही कारवाई नाही

# चिंचवडमधील राहिवाशांकडून 'ईमेल आंदोलन'!

## नदीपात्रातील भराव, नदीकाठची अतिक्रमणे हटवा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नदीपात्रातील अनधिकृत भराव काढण्याचे आश्वासन स्थानिक पदाधिकाऱ्यांनी दिल्यानंतरही कोणतीही कारवाई झाली नाही. त्यामुळे चिंचवडमध्ये नागरिकांनी अनोखे ई मेल आंदोलन सुरू केले आहे. मनपा आयुक्त, पर्यावरण विभाग आणि जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना शेकडो नागरिकांनी ई-मेलद्वारे निवेदनेपाठवून तातडीने कारवाईची मागणी केली आहे.**

नागरिकांनी पवना नदीपात्रातील अनधिकृत भराव, तसेच नदीलगतच्या शेतजमिनींवर उभारलेल्या व्यावसायिक अनधिकृत बांधकामांवर त्वरित कारवाई करण्याचा आग्रह धरला आहे. नदीचा नैसर्गिक उतार बिघडविणाऱ्या या भरावामुळे भविष्यात चिंचवडमध्ये गंभीर पूरस्थिती उद्भवू शकते, अशीभीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली आहे. म्हणूनच भराव तत्काळ हटवून नदीचा मूळ प्रवाह पुनर्स्थापित करण्याचीमागणी करण्यात आली आहे. पुराच्या संभाव्य धोक्याची जाणीव करून देण्यासाठी नागरिकांनी परिसरात जनजागृतीसुरू केली असून अनेक नागरिक स्वयंस्फूर्तीने या चळवळीत सहभागी होत आहेत. अनधिकृत भरावाची ठोस पुरावे सादर करण्याची तयारीही नागरिकांनी अधिकाऱ्यांना दर्शवली आहे. पवना



### राजकीय नेत्यांचे आंदोलनाकडे दुर्लक्ष

या जनआंदोलनात प्रभाग १८ मधील माजी नगरसेवक आणि निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्या संभाव्य उमेदवारांना सहभागी होण्याचे नागरिकांनी भावनिक आवाहन केले होते. मात्र अद्याप कोणताही उमेदवार या मोहिमेला खुला पाठिंबा देऊन पुढे आला नाही, याबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

नदी वाचवण्यासाठी चिंचवडमध्ये सुरू झालेल्या या अनोख्या ईमेल आंदोलनामुळे प्रशासनावर तातडीच्या कारवाईचा दबाव वाढला आहे.

# अवघ्या ४८ तासांत घडफोडी उघड!

## 25.13 लाखांचे दागिने जप्त; गुन्हे शाखा युनिट तीनची कामगिरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-३ने अवघ्या ४८ तासांत घरफोडी प्रकरणाचा छडा लावत अट्टल चोरट्यांना जेरबंद केले आहे. या कारवाईत तब्बल २५ लाख १३ हजार ५९८ रुपये किमतीचा सोन्याचा-चांदीचा ऐवज, रोख रक्कम, वाहनं आणि घरफोडी साहित्यासह मोठा माल जप्त करण्यात आला. शहरातील घरफोडी मालिकेला आळा घालत या पथकाने पुन्हा एकदा आपल्या तत्परतेचा ठसा उमटवला आहे.**




**अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अशी—**

मोसीन शौकतअली शेख (३२), उदयवीर मलखानसिंग सहासी (३६) आणि विनय कुमार गंगासरन (३४)—हे तिघेही मूळचे मेरठ, उत्तर प्रदेश येथील आहेत.

**मेरठहून सरळ पिंपरी चिंचवडमध्ये 'मोहीम'**

गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मेरठमधून दुचाकीवरून थेट शहरात येऊन दिवसाढवळ्या सूने घरांची रेCCE करून घरफोड्या करत. चोरी झालेला माल घेऊन परतीच्या प्रवासात ही दुचाकी ते खास टेम्पोमध्ये ठेवत असत. या संशयास्पद हालचालींवर पोलिसांनी बारीक नजर ठेवली आणि शेवटी तिघांचा सुगावा लागताच युनिट-३ ने अत्यंत कौशल्याने सापळा रचत त्यांना अटक केली.

**जप्त मालाची तब्बल किंमत—**

२५ लाख १३ हजार ५९८ रुपये

**कारवाईदरम्यान आरोपींकडून मिळालेला ऐवज—**

सोन्या-चांदीचे दागिने रोख रक्कम पांढऱ्या रंगाचा टेम्पो (किंमत–१३ लाख रुपये)

होंडा शाईन दुचाकी घरफोडीसाठी वापरलेली सगळी सामग्री या मालाची एकूण किंमत २५.१३ लाख रुपये एवढी आहे. टेम्पोचा उपयोग चोरीनंतर दुचाकी लपवण्यासाठी आणि ऐवज वाहतुकीसाठी आरोपी करत असत.

**शहरातील चार घरफोड्या उघडकीस**

या टोळीने पिंपरी-चिंचवड परिसरातील विविध भागात घरफोड्या केल्याची कबुली दिली असून, दिघी, चाकण, काळेवाडी, सांगवी या चार महत्त्वाच्या घरफोड्या प्रकरणांचा छडा लागला आहे. या चोरींमुळे गेल्या काही आठवड्यांपासून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

**तडफदार पथकाचे कौतुक**

ही कामगिरी खालील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली—
पोलीस आयुक्त : विनय कुमार चौबे
उपायुक्त (गुन्हे) : डॉ. शिवाजी पवार
सहायक आयुक्त (गुन्हे) : डॉ. विशाल हिरे
वरिष्ठ निरीक्षक : संतोष कसबे

**कारवाई करणारे मुख्य अधिकारी व कर्मचारी—**

उपनिरीक्षक भरत गोसावी, पोलिस उपनिरीक्षक सुनिल जावळे, तांत्रिक सहाय्यक प्रकाश ननावरे, तसेच बाबासाहेब गर्जे, सोमनाथ बोऱ्हाडे, सागर सुर्यवंशी, श्रीधन इचके, संदिप सोनवणे, मनोज साबळे, रुषिकेश भोसुरे, अजित रुपनवर, स्वप्रिल महाले, योगेश कोळेकर, शशिकांत नांगरे, बाळासाहेब भांगले, सुंदर थोरात, समीर काळे, सुधीर दांगट, दिलीप राठोड, तुषार वराडे, राजकुमार इघारे, निखील फापाळे आणि प्रदीप राळे यांनी धडाकेबाज भूमिका पार पाडली.



## भूमिका

**आपल्या देशात राजेशाही, मुघलशाही, हुकूमशाही आणि इंग्रज्यांची ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून सुरु झालेली दडपशाही यांना झुगारून, मातीत मिळवून निर्माण झालेली लोकशाही यासर्वांमध्ये सर्वसामावेशक आणि अधिक लोकहिताची अर्थातच हिला जपण्याकरिता आपण जागरूक राहणे अधिक आवश्यक कारण अश्याच कंपन्याच्या माध्यमातून आपला एकाधिकार जमवू पाहतायत.**

# एकाधिकारशाही लोकशाहीला घातकच !



क्षेत्र कुठलेही असो एकाधिकारशाही ही समजहिताची नसून त्या एकट्या व्यक्ती किंवा कंपनीलाच लाभ देते. मनोपल्ली गाजावणाऱ्या कंपनी असो, राजनैतिक पक्ष असो किंवा कुठलेही इतर क्षेत्र असो कारण जर स्पर्धा नसेल तर मिळणारी सुविधा ही चांगली मिळेलच याची कुठलीही खात्री नाही याउलट स्पर्धा असेल तेंव्हा तुम्हाला मानवी स्वभावानुरूप मिळणारी सुविधा, अधिकार हा अधिक चांगल्या पद्धतीने मिळेल हे मात्र नक्की.

खरंतर या विषयाची चर्चाच मुळात का सुरु झालीय तर नुकताच इंडिगो एअर लाईन मुळे निर्माण झालेली परिस्थिती आणि त्यातून प्रवाश्यांना झालेला त्रास जो की अदयावत देखील संपलेला नाही. सुरुवात होतेय ती वारंवार होणाऱ्या विमान दुर्घटनेतून आणि त्यानंतर समित्या गठीत करून चौकश्या करण्यात येतात चौकशी अंती काय तर विमानात बिघाड परंतु त्यासोबतच वैमानिकाच्या आरोग्याचा प्रश्न देखील ऐरनिवर आला अपुऱ्या झोपेला घेऊन थोडक्यात काय तर आरोग्याच्या दृष्टिकोनातून मग काय सरकारने नियमावली जारी केली ज्यात वैमानिक सोबतच क्रू स्टाफ यांच्या कामकरण्याच्या वेळापत्रकात सुट्ट्या वाढविणे आणि त्यांची संख्या वाढविणे हा अनिवार्य बदल करण्यात आला आणि याची तात्काळ अमल बजावणी करण्यात यावी असा आदेश सरकारने दिला आणि तितक्याच तत्परतेने विमान कंपनीने याला लागू करण्याकरिता वेळ लागेल असे कळविले मग 2024 ला दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी 2025 च्या शेवटपर्यंत देखील करण्यात आली नाही किंवा कुठली तत्सम हालचाल देखील दिसली नाही, त्यामुळे प्रवाश्यांना होणारा संभाव्य त्रास सुरु झाला तोही रुसी राष्ट्रध्यक्ष भारतात आले असतांना ज्यामुळे महासत्ता असणाऱ्या देश्याच्या किरकोळ प्रश्नाला हाताळतांना कशी दमछाक होते आणि घेतलेला निर्णय कसा मागे घेण्याची नामुष्की सरकारवर ओढवते ही बाब ती औरच परंतु यातून लक्षणीय बाब ती म्हणजे इंडिगो एअर लाईन्सचा 65% या क्षेत्रावर एकाधिकार नसता तर लोकांना होणाऱ्या त्रासाला इतर पर्याय उपलब्ध असता आणि त्यांनी सरकारने दिलेल्या नियमावलीला गांभीर्याने घेतले देखील असते, ज्याप्रमाणे या प्रकरणात नफयात असणाऱ्या इंडिगो कंपनीचे संचालक कुठल्याही प्रकारचा निर्णय ठरलेल्या कालावधीत का घेऊ शकले नाही त्याचप्रमाणे नागरिक उड्डयन मंत्रालय या विभागाने देखील दूरदृष्टी ठेऊन या कालावधीत कुठलीही ठोस पावलं का उचलली नाहीत हा प्रश्न देखील इथे निर्माण होतोय.

देशात आजघडीला ज्याप्रमाणे एकच पक्ष, एकच गटबंधन राजकारणात अनिवार्य झालाय आणि विरोधीपक्ष आणि त्यांचा आवाज जसा ऐकायला येतं नाही तसेच या प्रकरणाच्या माध्यमातून चर्चेला आलेला एकाधिकाराचा, मनोपल्लीचा विषय हा पुढील होऊ घातलेल्या इतर क्षेत्रातील अनेक दुर्घटनांना अधोरेखित करतोय हे मात्र नक्की कारण उदाहरणा दाखलच घ्यायचे झाले तर नागरी उड्डयन क्षेत्रात इंडिगो, दूरध्वनी-दुरसंचार क्षेत्रात अंबानीचे जिओ, खाद्य तेल मध्ये फॉर्चून, सिमेंट मध्ये सध्यातरी अल्ट्राटेक आहे परंतु अंबुजा, ए सी सी सारख्याना विकत घेऊन पुढील वाटचाल करणारा अदाणी ग्रुप परंतु ही वाटचाल उपभोक्तां करिता पुढील काळात घातक ठरू शकते कारण सुरवातीला मोफत सेवा देणारा जिओ नंतर तुमची अनिवार्य खर्चिक गरज बनतेय आणि मग तुम्ही त्यांचे लागणारे आकार दर गप गुमान भरता आणि हे सांगायला-ऐकायला आपल्याला कुठलीही जागा उरली नाही.तसें पाहिले तर नफ्यात असणाऱ्या इंडिगोचे उदाहरण इतरांनी डोळ्यासमोर ठेऊन या क्षेत्रात उत्तम स्पर्धा निर्माण व्हायला हवी परंतु तसें न होता नागरी उडडयन क्षेत्रात नव्याने पाऊल ठेवणाऱ्या आणि एकाधिकार प्रस्तापित करणाऱ्या अदानी समूहाकरिता ही सोयीचीच बाब झाली आहे कारण नुकताच पायलट प्रशिक्षण आणि सिम्युलेशन कंपनीमध्ये बहुसंख्य हिस्सेदारी (72.8%) ₹820 कोटींमध्ये विकत घेतली आहे.

## प्रासंगिक »

### दिवाळखोरीकडेच ?

***मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्यामुळे तिजोरीतील खडखडाटाची कबुलीच मिळाली होती.***

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ५७ हजार कोटी रु. तर हिवाळी अधिवेशनात ७५ हजार कोटी रु. म्हणजेच आर्थिक वर्षाच्या नऊ महिन्यांतच एक लाख ३२ हजार कोटींच्या एकूण पुरवणी मागण्या मांडण्यात येतात, मंजूरही होतात, हे सारे वित्तीय नियोजन बिघडल्याचे लक्षण. अर्थसंकल्पात एखाद्या प्रकल्पाकरिता तरतूद करण्यात आलेला निधी कमी पडला किंवा अर्थसंकल्प सादर झाल्यावर नवीन योजना सुरू करण्यात आली वा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास मदतीवर होणारा खर्च भागवण्यासाठी अतिरिक्त खर्च करता यावा, अशा मूळ हेतूने पुरवणी मागण्यांची तरतूद विधिमंडळ कामकाजात आहे. पुरवणी मागण्यांमधून भागवलेला खर्च फारच वा तातडीने आवश्यक असावा आणि हा वाढीव खर्च भागवण्यासाठी पुढल्या काळात रोखे, कर्जरूपाने पैसा उभारावा किंवा अन्य खात्यांचा निधी वळवावा, अशी यामागील अपेक्षा.

आरक्षणाचे उपवर्गीकरण आणि 'क्रीमी लेयर'ची संकल्पना लागू करणे हे आरक्षणाच्या मूलभूत उद्देशाच्या आणि सामाजिक न्यायाच्या विरोधात नसून, ते खऱ्या अर्थाने समानता आणण्यासाठी आवश्यक यंत्रणा आहे.अशी मखलाशी भूषण गवई यांनी सरन्यायाधीश पदावर असताना 'जोडे खात' देखील 'उपवर्गीकरण' आणि क्रिमी लेअरचे समर्थन केले.

# गवईचा आरक्षणावरचा विषारी हल्ला

पदावर असताना मागासवर्गीय समाजाच्या पाठीत विश्र्वासघातकी खंजीर खुपसला होता.तोच आरक्षण द्रोह त्यांनी पद गेल्यावर देखील कायम ठेवला आहे.ज्या आरक्षणाने गवई ह्यांचे 'बापजादे' सभापती, राज्यपाल झाले.त्याच आरक्षण विरुद्ध गरळ ओकण्याचे काम गवई करीत आहेत. आरक्षणाने आरक्षित समाजाला काही प्रमाणात सन्मान मिळवून दिला, त्याच आरक्षणाचे तुकडे करून त्याची शक्ती नष्ट करण्याचा गवई कावा म्हणजे ऐतिहासिक संवैधानिक द्रोह आहे!गवई करीत असलेले विधान म्हणजे 'आरक्षण न मिळाल्याने वंचित राहिलो' या खोट्या रडगाण्यामागे दडलेले जातीय राजकारण आहे.हा सवर्णांनी सेट केलेला नरेटीव्ह गवई पुढे रेटून नेत आहेत.आरक्षणाचा लाभ सर्वांना मिळाला नाही, कारण देशात आजही पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही, मिळत नाही.या भयावह वास्तवाकडे डोळेझाक करून, आरक्षणाची भाकरी एकमेकांमध्ये वाटून खाण्याची भाषा करणे, हे अत्यंत भिकार मांडणी आहे.हे



करताना आपण संविधानाची चिरफाड करून घटनाकाराच्या तत्त्वाचा गळा घोटत आहे, ह्याची जराही लाज लज्जा गवई ह्यांना वाटत नाही.त्याचे कारण बाळासाहेब आंबेडकर म्हणाले तसे "बापाने चळवळीचे वाटोळे केले आणि पोराने सरन्यायाधीश होण्यासाठी तुमचे वाटोळे केले" हे विधान गवईची खरी ओळख करून देणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य वर्गाला हजारो वर्षे सलग आणि सामूहिक मागासलेपण भोगणारा वर्ग मानले.त्यांनी ह्या प्रवर्गासाठी लढाई लढली.त्यांना अनुसूचित जाती जमाती व ओबीसी हा संविधानिक दर्जा बहाल केला.त्याच आरक्षित समूहाने पिढ्यानपिढ्या आरक्षण लाभ घेतला हे सांगून भूषण गवई उपवर्गीकरण करण्याचा निकाल देऊन त्याचे समर्थन करणारी भाषणे देत फिरत आहेत.हि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक ऐक्याच्या स्वप्नाची विटंबना आहे.हे लक्षात घेतले पाहिजे.कारण आरक्षण लागू होऊन फक्त ७० वर्ष झाली आहे मग किती पिढ्या आरक्षणाचा लाभ घेत प्रगत झाल्या असतील? गवई ज्यांना पिढ्यान् पिढ्या आरक्षणाचा 'जास्त' लाभ मिळाला, असा दावा केला आहे तो किती तकलादू आहे याची त्यांना जाणीव नाही असे नाही.त्यांना एक नरेटिव्ह सेट करायचा आहे.आरक्षणाच्या मूळ तत्त्वांशी छेडछाड करण्याचे पद्धतशीर षडयंत्र आहे. ज्यांना मूळ आरक्षणातून जागा मिळत नाहीत, त्यांना 'उपवर्गीकरणातून मिळेल' असे आमिष दाखवून, संपूर्ण समाजाला एकमेकांविरुद्ध उभे करायचे आणि आरक्षणाच्या अंमलबजावणीतील सरकारचे अपयश लपवायचे आहे.हा भाजप आणि संघाचा अजेंडा भूषण गवई वाहून नेत आहेत.गवई आणि त्यांच्या समर्थकांनी हे लक्षात ठेवावे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## सिडकोच्या दरात कपात? घरांच्या वाढत्या किमतींमुळे निर्माण झालेली अडचण

# सिडको घरांच्या दरकपातीची शक्यता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**हक्काचं घर घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी एक मोठी आणि आशादायक माहिती समोर आली आहे. सिडको घरांच्या दरात कपात (CIDCO HOUSING PRICE CUT) होणार की नाही, याबाबतज राज्य मंत्रिमंडाची बैठक होणर आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या आहे. सिडको घरांच्या दरात कपात झाल्यास हक्काचं घर घेता येणार आहे.**

## कल्प आणि किंमत संरचनेचा आढावा



मिळालेल्या माहितीनुसार, राज्यातील गृहनिर्माण क्षेत्रासाठी सिडकोची घरे अनेकांसाठी मोठा पर्याय मानली जातात. पण गेल्या काही वर्षात बांधकामाचा वाढता खर्च आणि तर कारणांमुळे सिडकोच्या घरांच्या किमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. त्यामुळे या किमती कमी करण्याची मागणीही केली जात होती. या पार्श्वभूमीवर सिडको घरांच्या दरात कपात करण्याबाबत सरकार आज महत्त्वाची बैठक घेणार आहे. राज्य सरकारकडून याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.आजच्या बैठकीत नगरविकास विभागाच्या नेतृत्वात सिडकोच्या घरांच्या किंमती आणि प्रलंबित प्रकल्पांशी संबंधित विविध मुद्द्यावर चर्चा होईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संबंधित अधिकारी या बैठकीला उपस्थित राहतील. विशेष म्हणजे, अनेक प्रकल्पांच्या सोडतींमध्ये काही घरे न सुटल्याने त्या घरांचे दरदेखील पुन्हा तपासले जाण्याची शक्यता आहे. याशिवाय काही प्रकल्पांमध्ये काम पूर्ण झाले असताही घरांच्या उच्च किंमतीमुळे अनेकांना घरे घेणे कठीण जात आहे. या सर्व विषयांवर आजच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. सिडकोच्या घरांचे दर कमी करण्यासाठी अंतिम निर्णय या बैठकीत घेतला जाऊ शकतो. जर घरांच्या दरात कपात झाली तर मध्यमवर्गीय आणि विविध उत्पन्न गटातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. परवडणाऱ्या घरांचा प्रश्न अनेक वर्षापासून गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे आज होणारा निर्णय सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठा आशादायक ठरणार आहे. सिडकोच्या प्रलंबित गृहनिर्माण प्रकल्पांवर या निर्णयाचा थेट परिणाम दिसून येऊ शकतो. दरकपात झाल्यास रिक्त घरे विक्रीची प्रक्रिया वेगाने पूर्ण होईल आणि नव्या प्रकल्पांना गती मिळेल. त्यामुळे एकूणच गृहनिर्माण क्षेत्रावर सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.आजच्या बैठकीत एकनाथ शिंदे कोणती भूमिका मांडतील आणि कोणता निर्णय जाहीर करतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नागरिकांना योग्य दरात घरे उपलब्ध करून देणे हा सरकारचा मुख्य उद्देश असल्याने ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात आहे. घरांच्या दरात कपात करण्याबाबत सरकारकडून सकारात्मक निर्णय झाल्यास हजारो नागरिकांच्या घराच्या स्वप्नाला नवी उभारी मिळू शकते.हक्काचं घर घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी एक मोठी आणि आशादायक माहिती समोर आली आहे. सिडको घरांच्या दरात कपात (CIDCO HOUSING PRICE CUT) होणार की नाही, याबाबतज राज्य मंत्रिमंडाची बैठक होणर आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या आहे. सिडको घरांच्या दरात कपात झाल्यास हक्काचं घर घेता येणार आहे सिडकोची घरे अनेकांसाठी मोठा पर्याय मानली जातात. पण गेल्या काही वर्षात बांधकामाचा वाढता खर्च आणि तर कारणांमुळे सिडकोच्या घरांच्या किमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या. त्यामुळे या किमती कमी करण्याची मागणीही केली जात होती. या पार्श्वभूमीवर सिडको घरांच्या दरात कपात करण्याबाबत सरकार आज महत्त्वाची बैठक घेणार आहे. राज्य सरकारकडून याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.आजच्या बैठकीत नगरविकास विभागाच्या नेतृत्वात सिडकोच्या घरांच्या किंमती आणि प्रलंबित प्रकल्पांशी संबंधित विविध मुद्द्यावर चर्चा होईल.

### अनेकांना घरे घेणे कठीण

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संबंधित अधिकारी या बैठकीला उपस्थित राहतील. विशेष म्हणजे, अनेक प्रकल्पांच्या सोडतींमध्ये काही घरे न सुटल्याने त्या घरांचे दरदेखील पुन्हा तपासले जाण्याची शक्यता आहे. याशिवाय काही प्रकल्पांमध्ये काम पूर्ण झाले असताही घरांच्या उच्च किंमतीमुळे अनेकांना घरे घेणे कठीण जात आहे.

# द्रुतगती महामार्गाच्या सुधारित आखणीस मान्यता

## पायाभूत सुविधा मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत मान्यता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नागपूर – चंद्रपूर शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग (HIGHWAY) अंतर्गत केंद्र शासनाच्या गतीशक्ती पोर्टलकडून प्राप्त सूचनांचा विचार करून एकूण 204 किलोमीटर लांबीच्या सुधारित रस्ता आखणीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.**



मुंबई शहरातील घाटकोपर पूर्व, चेंबूर आणि अंधेरी (प.) आंबिवली मुद्रण कामगार नगर व चुनाभट्टी येथील भूखंडांचा खासगीकरणाच्या माध्यमातून विकासाच्या मुदतवाढीस देखील आज आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरीकरणाचा वेग वाढता असल्यामुळे शहरांमध्ये निर्माण होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यास शासनाचे प्राधान्य आहे. पुणे जिल्ह्यातील हडपसर ते यवत मार्गावर वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात याव्यात. मात्र हे करताना नागरिकांना कुठलीही गैरसोय होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. या मार्गावर रस्त्याची सुधारणा करण्यात येऊन उन्नत महामार्ग बांधण्यात यावा. भैरोबा नाल्याजवळील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आवश्यक व तातडीच्या उपाययोजना कराव्यात.राज्यात सुरू असलेले पायाभूत सुविधांचे प्रकल्प तसेच प्रस्तावित प्रकल्पांना गती शक्ती पोर्टलकडून मान्यता घ्यावी. प्रत्येक प्रकल्प गतिशक्ती पोर्टलकडून मान्यता आल्यानंतरच समितीच्या बैठकीसमोर यावा, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी बैठकीत सादरीकरण केले. बैठकीस अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय, प्रधान सचिव (विधी व न्याय) सुवर्णा केवले, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरील सेलडोह इंटरचेंज ते दुर्ग हैदराबाद महामार्गावरील नवेगाव (मोर) पर्यंत महामार्ग बांधण्यात येणार आहे. याची लांबी 192 किलोमीटर असणार आहे. तसेच 11 किलोमीटर लांबीचा चंद्रपूर जोड रस्ता पूर्वीच्या आखणीनुसार कायम ठेवण्यात आला आहे. अशा एकूण 204 किलोमीटर लांबीच्या सुधारित रस्ता आखणीस मान्यता देण्यात आली आहे.

### वीजनिर्मिती क्षमतेची वाढ होणार

राज्याने पंप स्टोरेजमध्ये ७६,११५ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेपर्यंत मजल मारली आहे. महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य असून महाराष्ट्रात पंप स्टोरेज प्रकल्पांच्या उभारणीसाठी झालेल्या करारांमुळे ५,८०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेची वाढ होणार आहे.

## मोदींचा उत्तराधिकारी कोण ? RSS प्रमुख मोहन भागवत यांनी दिले स्पष्ट उत्तर

# योगी आदित्यनाथ की अमित शहा?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) यांच्यानंतर देशाचे नेतृत्व कोण करणार, याबद्दल देशातील राजकीय वर्तुळात गेल्या काही काळापासून जोरदार चर्चा सुरू आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ (YOGI ADITYANATH) आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह (AMIT SHAH) यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी (NITIN GADKARI) आणि राजनाथ सिंह (RAJANATH SINGH) यांची नावेही चर्चेत आहेत. दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) प्रमुख मोहन भागवत (MOHAN BHGWAT) यांनी सोमवारी तमिळनाडूची राजधानी चेन्नई येथे आरएसएसच्या शताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमात भागवत यांनी अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर आपले मत व्यक्त केले.**

## लोकांना परंपरा जपण्याचे आवाहन



पंतप्रधान नरेंद्र मोदींची जागा कोण घेईल, असे विचारले असता, भागवत यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणाचा अंतिम निर्णय भारतीय जनता पक्ष (BJP) आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील परस्पर चर्चेनंतर घेतला जाईल. भागवत म्हणाले की, ही संपूर्ण प्रक्रिया पक्षाच्या धोरण आणि शिस्तीनुसारच असेल. त्यांनी योगी आदित्यनाथ किंवा अमित शाह यांच्यापैकी कोणाचेही थेट नाव घेतले नाही. भागवत यांनी तमिळनाडूमध्ये आरएसएसच्या मर्यादित उपस्थितीवरही भाष्य केले. ते म्हणाले, “राज्यात राष्ट्रवादी भावना १००% अस्तित्वात आहे, परंतु काही कृत्रिम अडथळे ही भावना पूर्णपणे प्रकट होण्यापासून रोखत आहेत.” भागवत यांनी आश्वासन दिले की, हे अडथळे फार काळ टिकणार नाहीत आणि ते दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तमिळनाडूचे लोक त्यांच्या संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रहितासाठी समर्पित आहेत आणि ही मूल्ये आणखी मजबूत करणे महत्त्वाचे आहे.आरएसएस प्रमुखांनी तमिळनाडूतील जनतेला त्यांची मातृभाषा बोलण्याचे आणि पारंपरिक जीवनशैली टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. लोक तमिळमध्ये स्वाक्षरी करण्यास का कचरतात, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. भागवत यांनी सर्व भारतीय भाषांना समान महत्त्व दिले, कारण त्या आपल्या सांस्कृतिक ओळखीचा आणि अभिमानाचा भाग आहेत. त्यांनी दक्षिण भारतीय राज्यांच्या संस्कृतीचे प्रतीक असलेल्या पारंपरिक पोशाख “वेष्टी” चे कौतुक केले. भारतीय संस्कृतीची ही विविधता जपणे आणि प्रोत्साहन देणे समाज आणि देश दोघांसाठीही महत्त्वाचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) यांच्यानंतर देशाचे नेतृत्व कोण करणार, याबद्दल देशातील राजकीय वर्तुळात गेल्या काही काळापासून जोरदार चर्चा सुरू आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ (YOGI ADITYANATH) आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह (AMIT SHAH) यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी (NITIN GADKARI) आणि राजनाथ सिंह (RAJANATH SINGH) यांची नावेही चर्चेत आहेत. दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) प्रमुख मोहन भागवत (MOHAN BHGWAT) यांनी सोमवारी तमिळनाडूची राजधानी चेन्नई येथे आरएसएसच्या शताब्दीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमात भागवत यांनी अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर आपले मत व्यक्त केले.असे विचारले असता, भागवत यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणाचा अंतिम निर्णय भारतीय जनता पक्ष (BJP) आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील परस्पर चर्चेनंतर घेतला जाईल.

### मोदींची जागा कोण घेईल

ही संपूर्ण प्रक्रिया पक्षाच्या धोरण आणि शिस्तीनुसारच असेल. त्यांनी योगी आदित्यनाथ किंवा अमित शाह यांच्यापैकी कोणाचेही थेट नाव घेतले नाही.भागवत यांनी तमिळनाडूमध्ये आरएसएसच्या मर्यादित उपस्थितीवरही भाष्य केले. ते म्हणाले, “राज्यात राष्ट्रवादी भावना १००% अस्तित्वात आहे, परंतु काही कृत्रिम अडथळे ही भावना पूर्णपणे प्रकट होण्यापासून रोखत आहेत.

# आयोगापासून कायद्यातील बदलांपर्यंत

## राहुल गांधींचे निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही महिन्यापासून लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी सातत्याने केंद्र सरकारच्या निर्णयांवर टिका करत आहेत. जीएसटीपासून निवडणुकांच्या तोंडावर होणाऱ्या एसआयआर प्रक्रियेपर्यंत राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या निर्णयांवर निशाणा साधला आहे.**

अशातच संसदेच्या हिवाळी अधिवेशनातही राहुल गांधींचा आक्रमक बाणा दिसून येत आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आज राहुल गांधी ( RAHUL GANDHI) यांनी पुन्हा केंद्र सरकारला तीन प्रश्न विचारत मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे.निवडणूक आयुक्तांच्या निवड समितीतून सरन्यायाधिशांनाच का वगळण्यात आले असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर २०२३ मध्ये केंद्राने कायद्यात बदल का केला. ज्यामुळे निवडणूक आयुक्तांना त्यांच्या कोणत्याही कृतीसाठी शिक्षा केली जाऊ शकत नाही. यापूर्वी कोणत्याही पंतप्रधानांनी अशी भेट दिली नव्हती. निवडणुका झाल्यानंतर ४५ दिवसांतच सीसीटिव्ही फुटेज नष्ट करण्याची परवानगी देणारा कायद्यात बदल



का करण्यात आला, असे सवाल उपस्थित करत राहुल गांधींनी मोदी (NARENDRA MODI) सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्नकेला आहे. तसेच हा डेटाचा प्रश्न नसून निवडणुका चोरण्याचा प्रश्न असल्याचा हल्लाबोलही राहुल गांधींनी केला आहे.महात्मा गांधींची हत्या झाल्यानंतर त्यांच्या समान भारताच्या कल्पनेचा नाश करण्याचा प्रकल्प सुरू झाला, या प्रकल्पाचा पुढचा टप्पा म्हणजे भारतातील संस्थात्मक चौकटीवर ताबा मिळवणे. आता भारतीय विद्यापिठांच्या कुलगुरुंची नियुक्ती ही योग्यता, क्षमता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित राहिली नाही. तर ते विशिष्ट संघटनेचे सदस्य आहेत. या आधावर केली जाते. सीबीआय (CBI), ईडी (ED) आणि आयकर विभाग (INCOME TAX DEPARTMENT) यांसारख्या महत्त्वाच्या तपास संस्थांवर नियंत्रण मिळवणे, तसेच आपल्या विचारसरणीचे समर्थन करणारे आणि विरोधकांविरोधात कार्यवाही करणारे नोकरशहा नियुक्त करणे—ही संस्थात्मक ताब्याची दुसरी पायरी मानली जात आहे. देशातील निवडणूक प्रक्रियेवर थेट देखरेख ठेवणारी संस्था देखील आता त्यांच्या प्रभावाखाली गेली.

### सातत्याने आक्रमक भूमिका

राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी म्हटले की, एक काळ असा होता जेव्हा निवडणूक आयोग संस्थात्मकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वायत्त होता; मात्र आज तो आरएसएस आणि भाजपच्या नियंत्रणाखाली कार्य करीत असल्याचे चित्र दिसत आहे.

# विकीच्या आगामी चित्रपटात दीपिका




विकी कौशलचा आगामी चित्रपट “महावतार” गेल्या काही काळापासून प्रेक्षकांमध्ये चर्चेचा विषय बनला आहे. हा चित्रपट २०२६ च्या ख्रिसमसला प्रदर्शित होणार आहे. विकी कौशलसोबत कोणती अभिनेत्री काम करणार आहे हे जाणून घेण्यासाठी चाहते खूप दिवसांपासून उत्सुक होते. आता हे रहस्य उलगडले आहे. मीडिया रिपोर्ट्सवर विश्वास ठेवायचा झाला तर, दीपिका पदुकोण या चित्रपटात मुख्य अभिनेत्री असेल. खरं तर, दीपिका पदुकोणला अलीकडेच मुंबईतील मॅडॉक फिल्म्सच्या कार्यालयात पाहिले गेले. तिथे तिच्या उपस्थितीमुळे चाहते आणि इंडस्ट्री दोघांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे. मिड-डेच्या वृत्तानुसार, “महावतार” चे निर्माते अशा अभिनेत्रीच्या शोधात होते जी परशुरामाच्या भूमिकेत गांभीर्य आणि भावनिक खोली आणू शकेल. “महावतार” टीमला दीपिका पदुकोणपेक्षा चांगले कोणीही सापडले नाही. विकी कौशलच्या विरुद्ध ती परिपूर्ण निवड असेल. दीपिका आणि निर्मात्यांमध्ये चर्चा सुरू झाली आहे, परंतु ती अद्याप सुरुवातीच्या टप्प्यात आहे. जर दीपिका या चित्रपटासाठी सहमत झाली तर ती पहिल्यांदाच विकी कौशलसोबत चित्रपटात काम करणार आहे. अहवालानुसार, स्टुडिओने ज्या शीर्ष नावांशी बोलले आहे त्यात दीपिका आहे. अहवालात असेही म्हटले आहे की विकीचा पौराणिक नाटक भगवान परशुरामांच्या कथेवर आधारित आहे.

# मुलाला सोडून जाणं त्रासदायक

अनेकदा प्रसिद्ध अभिनेत्री त्यांच्या मुलांच्या जन्मानंतर करिअरमधून ब्रेक घेताना दिसतात. मुलांचं संगोपण करता यावं, त्यांना वेळ देता यावा यासाठी त्या काही काळ कामातून ब्रेक घेत असल्याचं पाहायला मिळतं. मात्र, पुन्हा कामाला सुरुवात केल्यानंतर मुलाला घरी ठेवून बाहेर कामावर जाणं हे त्यांच्यासाठी खूप कठीण असतं. अशाच एका प्रसंगावर छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्रीने तिचं मत व्यक्त केलं आहे. छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारत घराघरात पोहोचलेली अभिनेत्री अनिता हसनंदानी हिने मुलाच्या जन्मानंतर कामातून काही काळासाठी ब्रेक घेतला होता. याबाबत तिने नुकतच ‘फिल्मी ग्यान’ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिचा नवरा रोहित रेड्डीने तिच्यासाठी एक भावनिक मॅसेज पाठवला होता. तो मॅसेज ऐकल्यानंतर अनिताला रडू कोसळल्याचं या मुलाखतीमध्ये पाहायला मिळालं.अनिता हसनंदानी ही ‘ये हैं मोहब्बतें’ या मालिकेमुळे घराघरात प्रसिद्ध झाली होती. मुलाच्या जन्मानंतर तिने काही काळ अभिनयापासून विश्रांती घेतली होती. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिने याबद्दल सविस्तर सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिच्या पतीने (रोहित रेड्डीने) तिला एक भावनिक मॅसेज पाठवला होता, तो ऐकून अनिताला अश्रू अनावर झाले.अनिता म्हणाली, “मी जेव्हा माझ्या मुलाला घरी ठेवून शूटिंगला जाते, माझ्यासाठी ती खूप मोठी आणि कठीण गोष्ट आहे. अशा वेळी रोहितने मला दिलेला पाठिंबा माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. एक आईच जाणू शकते की, मुलाला सोडून बाहेर जाणं किती वेदनादायक असतं.”अनिताने आजवर ‘ये हैं मोहब्बतें’, ‘गुटर गू’, ‘कसम से’, ‘बहू हमारी रजनीकांत’, ‘करम अपना अपना’, ‘त्रीदेवियां’, ‘कयामत’, ‘एक हजारों में मेरी बेहना है’ आणि ‘नागीन’ अशा अनेक मालिकांमध्ये काम केलं आहेअनेकदा प्रसिद्ध अभिनेत्री त्यांच्या मुलांच्या जन्मानंतर करिअरमधून ब्रेक घेताना दिसतात. मुलांचं संगोपण करता यावं, त्यांना वेळ देता यावा यासाठी त्या काही काळ कामातून ब्रेक घेत असल्याचं पाहायला मिळतं. मात्र, पुन्हा कामाला सुरुवात केल्यानंतर मुलाला घरी ठेवून बाहेर कामावर जाणं हे त्यांच्यासाठी खूप कठीण असतं. अशाच एका प्रसंगावर छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्रीने तिचं मत व्यक्त केलं आहे. छोट्या पडद्यावरील प्रसिद्ध मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारत



घराघरात पोहोचलेली अभिनेत्री अनिता हसनंदानी हिने मुलाच्या जन्मानंतर कामातून काही काळासाठी ब्रेक घेतला होता. याबाबत तिने नुकतच ‘फिल्मी ग्यान’ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिचा नवरा रोहित रेड्डीने तिच्यासाठी एक भावनिक मॅसेज पाठवला होता. तो मॅसेज ऐकल्यानंतर अनिताला रडू कोसळल्याचं या मुलाखतीमध्ये पाहायला मिळालं.अनिता हसनंदानी ही ‘ये हैं मोहब्बतें’ या मालिकेमुळे घराघरात प्रसिद्ध झाली होती. मुलाच्या जन्मानंतर तिने काही काळ अभिनयापासून विश्रांती घेतली होती. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिने याबद्दल सविस्तर सांगितलं आहे. या मुलाखतीदरम्यान तिच्या पतीने (रोहित रेड्डीने) तिला एक भावनिक मॅसेज पाठवला होता, तो ऐकून अनिताला अश्रू अनावर झाले.अनिता म्हणाली, “मी जेव्हा माझ्या मुलाला घरी ठेवून शूटिंगला जाते, माझ्यासाठी ती खूप मोठी आणि कठीण गोष्ट आहे. अशा वेळी रोहितने मला दिलेला पाठिंबा माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. एक आईच जाणू शकते की, मुलाला सोडून बाहेर जाणं किती वेदनादायक असतं.”अनिताने आजवर ‘ये हैं मोहब्बतें’, ‘गुटर गू’, ‘कसम से’, ‘बहू हमारी रजनीकांत’, ‘करम अपना अपना’, ‘त्रीदेवियां’, ‘कयामत’, ‘एक हजारों में मेरी बेहना है’

# मला अक्षय खन्ना नेहमीच आवडतो : करीना कपूर

रणवीर सिंगचा धुरंधर चित्रपट सध्या चर्चेत आहे. “धुरंधर” चित्रपटात अक्षय खन्नाने रेहमान डकैतीची भूमिका साकारली आहे. अक्षयने रेहमान डकैतीची भूमिका साकारली आहे, या भूमिकेने इतर सर्व कलाकारांना मागे टाकले आहे. अक्षयच्या अभिनयानेच नव्हे तर बलुच गाण्यावरील FA9LAवरील त्याच्या नृत्यानेही सर्वांना मंत्रमुग्ध केले आहे. दरम्यान, करीना कपूरचा एक जुना व्हिडिओ पुन्हा समोर आला आहे. त्यात करिना अक्षय खन्नाबद्दल किती वेडी होती आणि तिने त्याचा एक चित्रपट २० वेळा कसा पाहिला होता हे उघड करते.२००४ मध्ये आलेल्या “हलचल” चित्रपटात करीना कपूर आणि अक्षय खन्ना यांनी एकत्र काम केले होते.

अक्षय खन्नासोबत काम करण्याबद्दल विचारले असता, करीनाने सांगितले होते की, “मी ‘हिमालय पुत्र’ हा चित्रपट किमान २० वेळा पाहिला आहे, कारण मी तेव्हा शाळेत होते आणि अक्षय खन्ना हा प्रत्येक मुलीचा क्रश होता.मुली त्याच्यासाठी वेड्या होत्या. मी देखील त्याच्यामागे अक्षरशः वेडी होते. ”अक्षय खन्नाने १९९७ मध्ये आलेल्या ‘हिमालय पुत्र’ या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले होते. “धुरंधरच्या कलेक्शन आणि कलाकारांबद्दल बोलायचे झाले तर, आदित्य धर दिग्दर्शित या चित्रपटात रणवीर सिंग, आर. माधवन, संजय दत्त, अर्जुन रामपाल आणि राकेश बेदी यांच्याही भूमिका आहेत, परंतु अक्षय खन्ना प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो. हा चित्रपट चांगली कमाई करत आहे. ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने देशांतर्गत १५२.७५ कोटी आणि जगभरात २२५ कोटी रुपयांची कमाई केली आहे.धुरंधर” हा चित्रपट जगभरातही चांगलाच गाजलेला चित्रपट आहे. पाच दिवसांत चित्रपटाने ₹२२५ कोटी (अंदाजे $१.२५ अब्ज) कलेक्शन केले आहे. देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर, त्याने निव्वळ कलेक्शनमध्ये ₹१५० कोटी (अंदाजे $१.५ अब्ज) ओलांडले आहे, तर त्याचे एकूण कलेक्शन ₹१८२.७५ कोटी (अंदाजे $१.८२ अब्ज) पर्यंत पोहोचला आहे. परदेशातही ₹४२ कोटी (अंदाजे $४.२ अब्ज) कमावले, ज्यामुळे जगभरात त्याची एकूण कमाई अंदाजे ₹२२५ कोटी (अंदाजे $२.२५ अब्ज) झाली. जर “धुरंधर” चित्रपटाची वाढती गती अशीच राहिली, तर दुसऱ्या आठवड्याच्या शेवटी तो सुमारे ₹१७५ कोटी (अंदाजे $१.७५ अब्ज) कमाई करेल अशी अपेक्षा आहे, ज्यामुळे हा चित्रपट वर्षातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या चित्रपटांपैकी एक बनेल. हा चित्रपट रणवीर सिंगच्या कारकिर्दीतील सर्वात मोठ्या यशांपैकी एक ठरेल.

**स्टार्कने चांगलीच झेप घेतली** मिचेल स्टार्कने मोठी झेप घेत पटकावले सर्वोत्तम स्थान

# यॉर्कर किंग बुमराहचे साम्राज्य धोक्यात!

## स्टार्कचे ८५२ रेटिंग गुण प्राप्त केले

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसीने नुकतीच कसोटी गोलंदाजी क्रमवारी जाहीर केली आहे. यामध्ये ॲशेस मालिकेतील दमदार कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत चांगलीच झेप घेतली आहे. पर्थ आणि ब्रिस्बेन कसोटीत सामन्यात चांगली कामगिरी करणाऱ्या स्टार्कने तीन स्थानांनी झेप घेत कारकिर्दीतील सर्वोत्तम तिसरे स्थान पटकावले आहे. त्याच्या प्रभावी झेपमुळे तो आता भारताच्या जसप्रीत बुमराहच्या पहिल्या क्रमांकाच्या अगदी जवळ येऊन पोहचला आहे.**






नोव्हेंबर २०२४ पासून भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत सातत्याने आपले अव्वल स्थान टिकवून आहे. त्याने बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या पर्थ कसोटीत शानदार कामगिरी केली होती, ज्यामध्ये त्याने पाच विकेट घेण्याचा समावेश होता. त्या सामन्यात भारताच्या विजयानंतर बुमराहने आपले पहिले स्थान कायम ठेवण्यात यश मिळवले आहे. सध्या त्याचे ८७९ रेटिंग गुण असून तो पहिल्या स्थानी विराजमान आहे. ताज्या आयसीसी कसोटी क्रमवारीत, मिचेल स्टार्कचे ८५२ रेटिंग गुण प्राप्त केले आहेत, तो जसप्रीत बुमराहपेक्षा फक्त २७ गुणांनी पिछाडीवर आहे. ॲडलेड, मेलबर्न आणि सिडनी येथे खेळल्या जाणाऱ्या ॲशेस मालिकेत तीन कसोटी सामने खेळायचे शिल्लक असताना, स्टार्कने बुमराहला मागे टाकून कसोटी क्रिकेटमध्ये अव्वल क्रमांकाचा गोलंदाज बनण्याची नामी संधी असणार आहे.मिशेल स्टार्कने ॲशेसची सुरुवात दमदार केली आहे. पर्थ कसोटीत त्याने १० बळी टिपले होते आणि ऑस्ट्रेलियाच्या आठ विकेटने विजयात महत्त्वाची भूमिका वठवली होती. या कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून त्याची निवड केली होती. ब्रिस्बेनमधील गाब्बा येथे झालेल्या डे-नाईट कसोटीमध्ये देखील स्टार्कची प्रभावी कामगिरी कायम राहिली आहे, जिथे त्याने पहिल्या डावात सहा बळींसह गुलाबी चेंडूने आठ बळी घेण्याची किमया साधली होती.ब्रिस्बेन कसोटीतील स्टार्कने आपली दमदार कामगिरी कामगिरी केली. त्यामुळे त्याला ३२ अतिरिक्त रेटिंग पॉइंट्स देखील मिळाले. त्याच सामन्यादरम्यान, तो वसीम अक्रमला मागे टाकत कसोटी क्रिकेटमध्ये डावखुऱ्या वेगवान गोलंदाजांमध्ये सर्वाधिक विकेट

### बुमराह २७ गुणांनी पिछाडीवर

आहे. सध्या त्याचे ८७९ रेटिंग गुण असून तो पहिल्या स्थानी विराजमान आहे. ताज्या आयसीसी कसोटी क्रमवारीत, मिचेल स्टार्कचे ८५२ रेटिंग गुण प्राप्त केले आहेत, तो जसप्रीत बुमराहपेक्षा फक्त २७ गुणांनी पिछाडीवर आहे. ॲडलेड, मेलबर्न आणि सिडनी येथे खेळल्या जाणाऱ्या ॲशेस मालिकेत तीन कसोटी सामने खेळायचे शिल्लक असताना, स्टार्कने बुमराहला मागे टाकून कसोटी क्रिकेटमध्ये अव्वल क्रमांकाचा गोलंदाज बनण्याची नामी संधी असणार आहे

घेणारा गोलंदाज देखील बनला. १०२ कसोटी सामन्यांमध्ये, मिशेल स्टार्कने ४२० विकेट घेण्याची किमया साधली आहे. ज्यामध्ये १८ पाच विकेट आणि तीन दहा विकेट घेतल्या आहेत. चालू ॲशेस मालिकेत दोन कसोटी सामन्यांमध्ये ४.०१ च्या इकॉनॉमी रेटने १८ विकेट घेऊन, त्याने हे दाखवून दिले आहे की, जर हाच फॉर्म कायम राहिला तर बुमराहचे अव्वल रँकिंग निश्चितच धोक्यात आणू शकतो. आयसीसीने नुकतीच कसोटी गोलंदाजी क्रमवारी जाहीर केली आहे. यामध्ये ॲशेस मालिकेतील दमदार कामगिरीमुळे ऑस्ट्रेलियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत चांगलीच झेप घेतली आहे. पर्थ आणि ब्रिस्बेन कसोटीत सामन्यात चांगली कामगिरी करणाऱ्या स्टार्कने तीन स्थानांनी झेप घेत कारकिर्दीतील सर्वोत्तम तिसरे स्थान पटकावले आहे.त्याच्या प्रभावी झेपमुळे तो आता भारताच्या जसप्रीत बुमराहच्या पहिल्या क्रमांकाच्या अगदी जवळ येऊन पोहचला आहे. नोव्हेंबर २०२४ पासून भारताचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने आयसीसी कसोटी गोलंदाजी क्रमवारीत सातत्याने आपले अव्वल स्थान टिकवून आहे. त्याने बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या पर्थ कसोटीत शानदार कामगिरी केली होती, ज्यामध्ये त्याने पाच विकेट घेण्याचा समावेश होता. त्या सामन्यात भारताच्या विजयानंतर बुमराहने आपले पहिले स्थान कायम ठेवण्यात यश मिळवले.

# जितेश शर्माची यष्टीरक्षकासाठी लॉटरी

## आगामी रणनीतीसाठी हा प्रयोग होत असल्याचे बोलले जात आहे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सध्या ५ सामन्यांची टी २० मालिका खेळली जात आहे. या वेळी पहिल्या सामन्यात भारतीय संघात संजू सॅमसनऐवजी जितेश शर्माचा यष्टीरक्षक फलंदाज म्हणून विचार करण्यात आला होता. हा पुढील वर्षी होणाऱ्या वर्ल्ड कपपूर्वी संघ व्यवस्थापनाकडून करण्यात येत असलेला एक प्रयोग मानण्यात येत आहे.**



अशातच आता भारताचा माजी यष्टीरक्षक दीप दासगुप्ताने या दोन खेळाडूंबाबत आपले मत व्यक्त केले आहे. फिनिशरला प्राधान्य देण्यात आल्याने थिंक टँकला दोष देणे योग्य नाही. शुभमन गिलच्या पुनरागमनानंतर सॅमसनला फलंदाजी क्रमात अव्वल क्रमांकावरुण वगळण्यात आले. यांमदये त्याची काही एक चूक नव्हती. तेव्हापासून, तो प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळविण्यासाठी संघर्ष करताना दिसत आहे. जितेश शर्मा हा संघात फिनिशरची भूमिका वठवू शकतो. दक्षिण आफ्रिका आणि

### जितेशला संघात ठेवणे योग्य

प्रत्येक खेळाडूसाठी दोन किंवा चार चेंडू फलंदाजी करणे हे काही सोपे नसते. जितेश पुढे म्हणतो की, "विश्वचषकापूर्वी भारताला नऊ सामने खेळायचे असून टी-२० विश्वचषकापूर्वी मला फारसा बदल अपेक्षित वाटत नाही." भारतीय संघाने टॉस गमावून प्रथम फलंदाजी करताना हार्दिक पंड्याच्या शानदार खेळीच्या(नाबाद ५९ धावा) जोरावर ६ गडी गमावून १७५ धावा उभ्या केल्या

त्यानंतर न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत खराब कामगिरी करत नसेल, तर टी-२० विश्वचषकाच्या सुरुवातीच्या सामन्यांमध्ये तो यष्टीरक्षक-फलंदाजाची भूमिका बाजवताना दिसू शकतो. सॅमसन आणि जितेश या दोन खेळाडू व्यतिरिक्त इतर तिसऱ्या कोणालाही यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून विचारात घेणे शक्य दिसत नाही. क्रिकेट तज्ज्ञांच्या मते जर सॅमसनला वरच्या फळीत फलंदाजी करण्याची संधी देण्यात आली नाही, करणार असेल, तर तुम्ही टॉप फळीतील फलंदाजापेक्षा एका विशेषज्ञ खालच्या फळीतील फलंदाजाला संघात समाविष्ट करणे योग्य ठरवाल.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। गुरुवार ।

। दि. 11 डिसेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महानगर पालिका निवडणूक : इंद्रायणीनगर परिसरात

# नीलम शिवराज लांडगे यांचा घरोघरी प्रचार

### “नागरिकांचा भाजपच्या विकासात्मक धोरणावर विश्वास - नीलम लांडगे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड: इंद्रायणी नगर परिसरात प्रभाग क्रमांक ८ मध्ये भाजपच्या नीलम शिवराज लांडगे यांनी रविवारी घर टू घर प्रचार करत मतदारांशी संवाद साधला. घरोघरी जाऊन नागरिकांचे प्रश्न जाणून घेतानाच त्यांनी भाजपची ध्येय-धोरणे, विकासाचा वेग आणि आगामी महापालिका निवडणुकीचे महत्त्व यांची माहिती दिली.**



नीलम लांडगे म्हणाल्या “गेल्या दहा वर्षांत पिंपरी-चिंचवड शहराने विकासाच्या दिशेने वेगाने झेप घेतली आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक, पायाभूत सुविधा, उद्याने, आरोग्य सेवा यांसह असंख्य प्रकल्प भाजपच्या माध्यमातून शहरात उभे राहिले. आज नव्या योजनांची अंमलबजावणीही मोठ्या प्रमाणात सुरू आहे.”

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली“भोसरी मतदारसंघाचा झालेला कायापालट सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. आमदार महेश लांडगे यांच्या अथक प्रयत्नांमुळे प्रभागनिहाय विकासाच्या कामांना मोठी चालना मिळाली आहे. त्यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलत आहे,”असे नीलम लांडगे म्हणाल्या. नागरिकांशी संवाद साधत नीलम शिवराज लांडगे यांनी प्रभागातील पायाभूत समस्या, नागरिकांची मागणी याविषयी संवाद साधला .नागरिकांचे मत भाजपला म्हणजेच विकासाला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत ‘भाजप’ला नागरिक निश्चित विश्वासाने पाठिंबा देतील,” असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. या घर-घर प्रचार मोहिमेत स्थानिक कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग दिसून आला.

## राजमाता जिजाऊ कनिष्ठ महाविद्यालयाचे क्रिकेट स्पर्धेत यश

### शिक्षण विश्व: तिसऱ्यांदा विजेतेपद घेऊन तीन खेळाडूंची राष्ट्रीयस्तरावर निवड

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथे गोल्डन अकॅडमीमध्ये झालेल्या शालेय राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत 17 वर्षांखालील मुलांच्या गटात राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय लांडेवाडी भोसरी येथील मुलांच्या संघाने पुणे विभागाचे प्रतिनिधित्व करत प्रथम क्रमांक पटकावून तिसऱ्यांदा विजेतेपदाचा मान मिळवला आहे.**



या स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याचा संघ जाहीर झाला असून रोनित पोद्दार अकरावी कॉम इंग्लिश स्वराज थरकुडे बारावी कॉम इंग्लिश आणि ध्रुविल रायठ्ठा अकरावी कॉम इंग्लिश या तीन खेळाडूंची तेलंगणा राज्यात होणाऱ्या शालेय राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे

विजयी संघात तन्मय माने स्वराज थरकुडे ध्रुवील रायता किरण सुर्वे साई गुंजाळ आदित्य शेंडगे शौर्य पाटील सोहम मोहिते रोनित पोद्दार अखिलेश पाटील आर्यन चव्हाण जय गोंदकर मुकुंद बाबर तेजस गिलबिले तन्मय पाटील आणि विहान बागड या खेळाडूंचा समावेश होता संघाला शारीरिक शिक्षण संचालक प्रा गोपीचंद करंडे आणि प्रशिक्षक दत्तात्रय वाळके यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आणि भोसरीचे प्रथम आमदार विलासराव लांडे यांनी संघाचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या तसेच संस्थेचे खजिनदार आणि मनपा स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे, सचिव सुधीर मुंगसे, पिंपरी मनपाचे माजी नगरसेवक आणि संस्थेचे विश्वस्त विक्रम लांडे, प्राचार्य डॉ. के जी. कानडे, उपप्राचार्य प्रा किरण चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ नेहा बोरसे, रजिस्ट्रार अश्विनी चव्हाण, विभाग प्रमुख प्रा. राजू हजारे, प्रा योगिता बारवकर, प्रा संगिता गवस तसेच सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## व्ही के माटे प्रशालेतील क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद

# स्काऊट गाईड पथकासाठी "खरी कमाई" उपक्रम!

## शिक्षण विश्व : विद्यार्थ्यांच्या व्यवसायिक कौशल्याला मिळाला भरघोस प्रतिसाद

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड व्ही के माटे प्रशालेतील क्रांतिवीर चंद्रशेखर आझाद स्काउट पथक आणि झाशीची राणी गाईड पथकातर्फे आयोजित खरी कमाई हा उपक्रम उत्साहात पार पडला विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले खाद्यपदार्थ विक्री करून उपक्रम यशस्वी करण्यास मोठा प्रतिसाद मिळाला.**



उपक्रमाचे उद्घाटन मोरया शिक्षण संस्थेच्या विश्वस्त कार्यवाह तथा प्राचार्या इंद्रायणी माटे पिसोळकर आणि संस्थेचे खजिनदार तसेच विश्वस्त रणजीत सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून खाद्यपदार्थ खरेदी करत लॉर्ड बेडन पॉवेल दालनाचे उद्घाटन केले. स्काऊट गाईड विभाग प्रमुख हनुमंत हुचगोळ यांनी या उपक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थ्यांना खरेदी विक्री, नफा,तोटा, व्यवसाय व्यवस्थापन ,मागणी, पुरवठा पूर्वतयारी, आर्थिक,देवाणघेवाण आणि व्यवहार कौशल्य प्रत्यक्ष अनुभवातून शिकता यावे हा हेतू असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी पुजारी यांनी केले.तर आभारप्रदर्शन अनिल तिटकरे यांनी केले.

**शिक्षकांनी घेतला विविध पदार्थांचा आस्वाद**

विद्यार्थ्यांनी ओली भेळ, सुकी भेळ,केक, पायनॅपल ज्यूस आवळा कॅन्डी, सँडविच, मसाला दूध अशा विस्तवाशिवाय बनवलेल्या पदार्थांसह वडापाव, सामोसे, इडली चटणी गोलगप्पे अप्पे असे विविध चविष्ट पदार्थ स्वतः तयार करून विक्रीस ठेवले. इयत्ता सहावी आणि सातवीतील स्काऊट व गाईडच्या एकूण 150 विद्यार्थ्यांनी स्टॉल लावले होते पाचवी ते दहावीतील विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या खाद्यपदार्थांचा मनसोक्त आस्वाद घेतला दोन दिवसांत विद्यार्थ्यांनी मिळून वीस हजार रुपये खरी कमाई केली. उपक्रमाला

**उत्स्फूर्त प्रतिसाद**

या उपक्रमाला पालक शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशात स्काऊट मास्टर आणि गाईड कॅप्टन अश्विनी पुजारी , अनिता बोरसे, मनीषा लोहार, उषा उजळंबकर यांच्यासह स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा मोठा वाटा होता ,श्लोक चिंचवडे ,अमरदीप बिरादार, स्वप्निल काळमे, शिवतेज नलवडे, राज देशपांडे अदिती इगवे यांनी विशेष मेहनत घेतली तर फलक लेखनाची जबाबदारी श्रीतेजा पांचाळ आणि प्रतीक्षा खोत यांनी सांभाळली.

## डीवाय पाटील कॉलेजच्या विद्यार्थिनीला मायक्रोसॉफ्टचे १० लाखांचे पॅकेज

## शिक्षण विश्व : पिंपरी चिंचवड मधील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वराळे येथील डॉ डी वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड इनोव्हेशन येथील विद्यार्थिनी वैभवी विनय माने हिने प्रतिष्ठित मायक्रोसॉफ्ट या आंतरराष्ट्रीय आयटी कंपनीमध्ये दहा लाख वार्षिक पॅकेजसह मिळवलेल्या नियुक्तीमुळे महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण आहे. महाविद्यालयाच्या प्लेसमेंट इतिहासातील हे आणखी एक उल्लेखनीय पाऊल ठरले आहे**






महाविद्यालयाच्या चेअरमन डॉ. सुशांत पाटील, सचिव ॲड. अनुजा पाटील, प्राचार्य डॉ. सुरेश माळी, सेंट्रल प्लेसमेंट ऑफिसर प्रा. संतोष राव बोर्डे, विभागप्रमुख डॉ. अल्पना अडसुळ, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. आशीष जावके, तसेच राहुल दुबे यांनी वैभवीचे मनःपूर्वक अभिनंदन केले. महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध जागतिक दर्जाच्या सुविधा आणि करिअर-केंद्रित प्रशिक्षण पद्धती यामुळे दरवर्षी अनेक विद्यार्थ्यांना नामवंत कंपन्यांमध्ये संधी मिळत असून, वैभवीचे यश त्याच मालिकेतील आणखी एक उजवे पाऊल मानले जात आहे.

वैभवीने महाविद्यालयातील अत्याधुनिक डिजिटल लॅब्स, आधुनिक इनोव्हेशन सेंटर, तसेच उपलब्ध करिअर-ओरिएंटेड प्रशिक्षण आणि प्रॅक्टिकल एक्स्पोजरचा उत्कृष्ट वापर करून स्वतःच्या तांत्रिक कौशल्याचा सातत्याने विकास केला. तिच्या सातत्यपूर्ण अभ्यास, तांत्रिक प्रावीण्य, समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता आणि शिस्तबद्ध वृत्तीमुळे तिला मायक्रोसॉफ्टसारख्या जागतिक कंपनीमध्ये काम करण्याची सुवर्णसंधी मिळाली.

पालक व शिक्षकांनी व्यक्त केलेल्या भावना देखील कौतुकास्पद आहेत. वैभवीचे हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून योग्य दिशा, मेहनत, मार्गदर्शन आणि चिकाटी यांच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते, हे तिने सिद्ध केले आहे.

महाविद्यालयात तिला मिळालेले मार्गदर्शन, फॅकल्टींचे सहकार्य आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर यामुळे तिच्या करिअरला नव्या वाटा खुल्या झाल्या. वैभवीच्या या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांमध्येही नव्या उमेदीचे व आत्मविश्वासाचे जागरण झाले आहे.

डी. वाय. पाटील ग्रुपचा 'इनोव्हेशन-ड्रिव्हन एज्युकेशन'चा ध्यास आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेला तयार करण्याची धोरणात्मक पद्धत आता सातत्याने सकारात्मक परिणाम देत आहे. वैभवीच्या मायक्रोसॉफ्टमधील निवडीमुळे महाविद्यालयातील प्लेसमेंट वेगाने उंचावत असल्याचे चित्र दिसत आहे.

मेहनत + कौशल्य + योग्य मार्गदर्शन = यश ही समीकरणे सत्यात उतरवत वैभवी मानेने पिंपरी-चिंचवडमधील विद्यार्थ्यांसाठी एक उज्वल उदाहरण निर्माण केले आहे


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION OPEN
FOR THE YEAR 2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046